# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/४४७/२०२१-२२ दिनांक :-१७/१२/२०२१

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा /५५७ /2021-22 दिनांक :- 17 /12/2021

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | भाईदर पुर्व साई आशिर्वाद को.ऑ.हौ.सोसयटीच्या आवारात नारळाचे झाड उंच वाढलेले असून सदर झाड सोसायटीच्या बाजुला असलेल्या घरावर पुर्णपणे वाकलेले आहे. सदरचे झाड जोराच्या वाऱ्याने पडून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 01 नग नारळाचे झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. (सन्मा.नगरसेविका सौ.वंदना विकास पाटील यांचे **दि.28/09/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग नारळ |
| 2. | भाईंदर (प.) स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्राच्या पुढे सेवालाल महाराज चौक येथे प्लॅनेटेरीया कॉम्पलेक्स कडे जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजुला रस्ता रूंदीकरणामध्ये (रोड फॅनिंगच्या कामात) बाधीत होत असल्याने सदर झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. (मा. कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे जा.क्र मनपा/ सा.बां./**5263/ 2021-22 दि.26/11/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग पिंपळ<br>01 नग गुलमोहर<br>01 नग अर्जुन |
| 3. | भाईंदर (प.) डोंगरी कर कार्यालय पुर्न:बांधणी करण्याचे काम चालु करण्यात येणार असून सदर कार्यालयाच्या मागील बाजुस कोपऱ्यामध्ये असलेले झाड बांधकामामध्ये अडथळा करीत असून सदरचे झाड काढणे आवश्यक आहे. (मा. कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे जा.क्र मनपा/ सा.बां./**5326/ 2021-22 दि.29/11/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग पापडी |
| 4. | सदरचे झाड भाईंदर (प.) अर्जदार श्रीमती रोझी कुटीन्हो रा.रोझी विला, घर नं.1280, स्टेला मारी हॉस्पीटल जवळ, उत्तन, भाईंदर (प.) येथील घराच्या लगत वाढलेले असून सदरचे झाड खाली वाकेलेले असून जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्रीमती रोझी कुटीन्हो यांचे दि.26/11/2021 रोजीचे पत्र)** | 01 नग नारळ |
| 5. | सदरची 2 नग झाडे भाईंदर (प.) 60 फुट रोड येथील रत्नदिप इमामरतीच्या कुंपणभिंती लगत असलेल्या नाल्यावर Wall Garden and Curtain Fountation चे काम सुरू होणार असून सदर कामात बाधीत होत असल्याने सदर झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.. (मा. कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे जा.क्र मनपा/ सा.बां./**5619/ 2021-22 दि.10/12/2021 रोजीचे पत्र.)** | 02 नग सप्तपर्णी |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

16.12.2021

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका